जा.क्र.न.अ./बां.प./६४
नगर अभियंता कार्यालय,
सोलापूर. दि. १८/०५/२०१६.

सोलापूर महानगरपालिका.

:जाहिर प्रसिध्दीकरण:

पावसाळ्याच्या दिवसांत जोरदार पावसामुळे शहरातील जुनी आणि कमकुवत घरे / चाळी इमारती पावसाच्या मा-यामुळे पडण्याची शक्यता आहे. तसेच झाडे, पोल इत्यादी कोसळण्याची शक्यता आहे. अशा धोक्यामुळे जिवीत व वित्त हानीही संभवते. सदर बाबी टाळणेसाठी खालील प्रमाणे खबरदारी नागरीकांनी घ्यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये आपल्या इमारतीची वेळोवळी तज्ञ इंजिनिअरकडून पाहणी करवून घेऊन इमारत अथवा इमारतीचा प्रत्येक भाग सुव्यवस्थित राखण्याची जबाबदारी संबंधीत घर मालकांची / भोगवटदारांची आहे. यासाठी जुन्या व कमकुवत घरांच्या मालकांनी / भोगवटदारांनी पाहणीनुसार आवश्यक पाडकाम स्वत: करुन घेणे अथवा दुरुस्त्या महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेऊन करणे आवश्यक आहे. बांधकाम परवानगीसाठी महानगरपालिका प्राधिकृत लायसेन्स व्यवसायिकांमार्फत रितसर अर्ज करुन, परवानगी घ्यावी.

यापूर्वी महानगरपालिकेकडून शहरातील ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या इमारतीची रचनात्मक स्थैर्य प्रमाणपत्र (Strutural Stability) महानगरपालिकेकडील नोंदणीकृत रचनाकार अभियंता यांचेकडून तपासून घेवून त्यांचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत दैनिक वृत्तमानपत्रामध्ये वेळोवेळी जाहिर प्रसिध्दीकरण देण्यात आलेले आहे. नोंदणीकृत रचनाकार व स्ट्रक्चरल इंजिनिअर यांची यादी बांधकाम परवानगी विभागाकडे उपलब्ध करुन ठेवणेत आलेली आहे.

एखादया इमारतीचा भाग अचानक कोसळल्यास झाडे, पोल इत्यादी पडल्यास अग्निशामक दल फोन नं.२७४०३६४ ते ६८, २६०४५२५ व १०१, नगर अभियंता कार्यालय फोन नं. २७४०३२१, बांधकाम परवानगी विभाग फोन नं. २७३५२६० नगर अभियंता भांडार फोन नं. २७४०३३५ तसेच

विभागीय कार्यालय क्र. १ फोन नं. २७४०३७० विभागीय कार्यालय क्र. ५ फोन नं. २७४०३७४
विभागीय कार्यालय क्र. २ फोन नं. २७४०३७१ विभागीय कार्यालय क्र. ६ फोन नं. २७४०३७५
विभागीय कार्यालय क्र. ३ फोन नं. २७४०३७२ विभागीय कार्यालय क्र. ७ फोन नं. २७४०३९९
विभागीय कार्यालय क्र. ४ फोन नं. २७४०३७३ विभागीय कार्यालय क्र. ८ फोन नं. २७४०३२२

या कार्यालयांना नागरीकांनी त्वरीत कळवावे.

तरी सर्व घर मालकांनी भोगवटदारांनी व नागरिकांनी पावसाळयात इमारती, झाडे व पोल पासून होणारा संभाव्य धोका टाळण्यास आणि जिवीत व वित्तहानी होऊ न देण्यास सोलापूर महानगरपालिकेस सहकार्य करावे.

आयुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.